# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.07.2026** **वार:सोमवार**

1. देशातील परीक्षा सुधारणांबाबत नंदन नीलेकणी यांच्या नेतृत्वाखाली उच्च-स्तरीय कार्यगट स्थापन केल्याची पंतप्रधानांची घोषणा
2. कॅच द रेन मोहिमेमध्ये नाशिक जिल्हयानं केलेल्या कामाची पंतप्रधानांनी मन की बातमध्ये घेतली दखल
3. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरीब रुग्णाचे वैद्यकीय उपचार थांबणार नाहीत; मुख्यमंत्र्यांची ग्वाही आणि
4. राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत मीराबाई चानूची सुवर्ण कामगिरी; तर क्रिकेटमध्ये झिम्बाब्वे विरुद्धच्या टी ट्वेंटी मालिकेत भारताला निर्भेळ यश

**मोदी-नीलकेणी**

तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत तज्ञ नंदन नीलेकणी यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा सुधारणांबाबत उच्च-स्तरीय कार्यगट स्थापन करण्यात आल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक आणि बळकट करणं हा उद्देश केंद्रस्थानी ठेवून त्या अनुषंगानं उपाययोजना करण्यावर या कार्यगटाचा भर असेल. यासंदर्भात पंतप्रधानांनी काल एक व्हिडिओ संदेश प्रसारित केला. ते म्हणाले....

**हमारी परीक्षा पद्धति विश्वस्त हो, हमारी परीक्षा पद्धति ट्रांसपेरेंट हो। हमारी परीक्षा पद्धति में सबसे ज्यादा टेक्नोलॉजी का उपयोग हो। इन सारी बातों को ध्यान में रखते हुए विश्व प्रसिद्ध टेक्नोलॉजी एक्सपर्ट श्रीमान नंदन निलेकनी जी के नेतृत्व में एक हाई पावर टास्क फोर्स बनाने का निर्णय किया है जो एक्जामिनेशन रिफॉर्म की तरफ फोकस करेगा और जल्द से जल्द आने वाली परीक्षाओं की विश्वसनीयता को सुनिश्चित करने का काम इसके रिपोर्ट के आधार पर कर दिया जाएगा।**

दरम्यान पेपर फूटी प्रकरणामध्ये अधिक कडक शिक्षेची तरतूद असलेलं 'सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध सुधारणा विधेयक 2026' आज लोकसभेत मांडण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग हे विधेयक मांडणार आहेत.

**जोशी-कार्यभार**

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल कर्तव्य भवन इथं शिक्षण मंत्रालयाचा पदभार स्विकारला. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयाची आढावा बैठक पार पडली, या बैठकीत त्यांनी विविध योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरीदेखील या बैठकीला उपस्थित होते.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'मन की बात' कार्यक्रमाच्या 136व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधला. कारगील विजय दिनानिमित्त हुतात्मा जवानांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या भाषणात स्वदेशी, पर्यावरण रक्षण, जल संवर्धन अशा विविध विषयांवर पंतप्रधानांनी भाष्य केलं. स्वदेशी आयएनएस महेंद्रगिरी, पिनाका आणि कुशा क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचण्यांचा उल्लेख करत आत्मनिर्भर भारताच्या संरक्षण सामर्थ्य वाढत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. गणेशोत्सवात मातीच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचं आवाहन देखील मोदी यांनी यावेळी केलं. पुढच्या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्यदिनी 'हर घर तिरंगा' अभियानात उत्साहाने सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं. ते म्हणाले....

**साथियो, पिछले कुछ वर्षों में 'हर घर तिरंगा' अभियान ने पूरे देश को एक अद्भुत भावना से जोड़ा है | हर घर, हर गली में तिरंगे का उत्सव दिखाई देता है | इस वर्ष भी हमें 'हर घर तिरंगा' अभियान को पूरे उत्साह के साथ आगे बढ़ाना है | अपने घर पर पूरे सम्मान के साथ तिरंगा फहराना है |**

'कॅच द रेन' अभियान, 'एक पेड माँ के नाम' तसंच पर्यावरण संवर्धनातील लोकसहभागाचं त्यांनी कौतुक केलं. भारतीय खेळाडू, शैक्षणिक ऑलिम्पियाडमधील विद्यार्थ्यांचे यश, विक्रम-1 रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण आणि नवोन्मेष क्षेत्रातील कामगिरीचा मोदी यांनी मन की बातमधून गौरव त्यांनी केला.

**<u>जलसंवर्धन-नाशिक-मन की बात</u>**

नाशिक जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या जलसंवर्धनाच्या उपक्रमाची पंतप्रधानांनी कालच्या मन की बातमध्ये दखल घेतली. याबाबत बोलताना नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले....

**कॅस्टन कॅम्पेन मध्ये सर्व शेतकरी बांधवाला माझी विनंती राहील की ज्या ज्या ठिकाणी आपल्या शेतावर बांधाच्या बाजूला ज्या ठिकाणी पाणी शिरते, त्या ठिकाणी जलतारा बांधावा त्याच्यासाठी रोजगार हमी योजना म्हणजे जी राम जी योजनेमध्ये निधी उपलब्ध आहे, आणि जेवढी क्षेत्र आपण निश्चित केलात तेवढ्या ठिकाणी आपण बांधून देऊ शकतो. याचे तीन चार फायदे राहणार, नंबर एक, ते कमी खर्चमध्ये होणारे प्रकल्प आहे. दुसरा आपलं भूजलस्तर विहीर पुनर्भरण या एक योजना करून वाढून जाणं. तिसरा भविष्यामध्ये त्या ठिकाणी रिचार्ज शाफ्ट एप्लाय करता येतो. चौथा या योजनामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात जो वाद होतो आजच्या डेटमध्ये पाणी आपण कसं काढून घेऊ त्या प्रश्न आपण ऑटोमॅटिकली आपल्याला सोडवता येतो.**

**<u>गरीब-उपचार</u>**

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरीब रुग्णाचे वैद्यकीय उपचार थांबू देणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते काल नागपूरमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे आयोजित महाआरोग्य शिबिरात बोलत होते. राज्य शासनाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा विस्तार करून गंभीर आजारांचा समावेश केला असून, काही आजारांसाठी 35 लाख रुपयांपर्यंत मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या दीड वर्षांत 57 हजार रुग्णांना 452 कोटी रुपयांची मदत देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कर्करोगावरील औषधांचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

**<u>तिरंगा यात्रा-धुळे</u>**

नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशव्यापी आंदोलन छेडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली एकता दाखवून देशाच्या लोकशाही इतिहासात सुवर्ण-अध्याय लिहिल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुंबईत शिवाजी पार्क इथं आयोजित तिरंगा मोर्चामध्ये त्यांनी काल युवकांना संबोधित केलं. आजची तरुण पिढी सरकारला आव्हान देऊ शकते, हे विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाने सिद्ध केल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. धुळे शहरात देखील विविध सामाजिक संघटना तसेच विद्यार्थी संघटनांनी एकत्र येत तिरंगा यात्रेचं आयोजन केलं होतं.

**<u>परभणी-पाऊस पाणी</u>**

परभणी जिल्ह्यात यंदा सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. अधिक माहिती एकुयात आमच्या प्रतिनिधीकडून....

**राज्यात सर्वत्र मान्सून सक्रिय झाला असला तरी जिल्ह्यात मात्र दमदार पावसाची प्रतीक्षा आहे, आज पर्यंत सरासरीच्या 88 मिलिमीटर एवढाच पाऊस झाला असून जिल्ह्यात 4 लाख 25 हजार हेक्टरवर पेरण्या झाल्यात. तर 93**

**हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या नाहीत. सध्या दोन दिवसांपासून हलक्या पावसाच्या सरी पडत आहेत मात्र विहिरी, बोअरवेलच्या पाणी पातळीत घट झाल्याने पिकांना पाणी उपलब्ध होत नाही. दमदार पाऊस नसल्याने अंतर्गत मशागतीची कामे खोळंबली आहेत, तर काही ठिकाणी सोयाबीन पिकांची वाढ थांबली आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने दुबार पेरणीची वेळ पडल्यास दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्याची तयारी केली आहे. सरासरीच्या तुलनेत पाऊस खूपच कमी आहे त्यामुळे येणाऱ्या काळासाठी जिल्ह्यात दमदार पावसाची आवश्यता आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सुदर्शन चापके परभणी.**

**वेटलिफ्टिंग**

ग्लासगो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत भारताच्या मीराबाई चानूनं भारोत्तोलनात 48 किलो वजनी गटात काल सुवर्ण पदकाची कमाई केली. मीराबाईनं एकंदर 190 किलो वजन उचलून राष्ट्रकूल स्पर्धेत नवा विक्रम प्रस्थापित केला. मीराबाई चानूच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचं अभिनंदन केलं आहे.

**क्रिकेट**

झिम्बाब्वे विरुद्धच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना भारताने 35 धावांनी जिंकला असून मालिकादेखील 3-0 अशी जिंकली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने वैभव सूर्यवंशीच्या 49 चेंडूतील 81 धावांच्या जोरावर 192 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल झिम्बाब्वेने 157 धावा केल्या. रायन बर्लने सर्वाधिक नाबाद 54 धावा केल्या. वैभव सूर्यवंशीला सामनावीर आणि मालिकावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**पाऊस-सोलापूर**

राज्याच्या विविध कालही पावसाने हजेरी लावली. संततधार पावसामुळे पुणे जिल्ह्यातील वीरधरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. त्यामुळे पंढरपूर जवळील भिमा नदीत्रात पाण्याची पातळी वाढल्याने पंढरपूरातील जुना दगडी पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. उजनी धरणाच्या पाणी पातळीतही वाढ होत आहे.

**नाशिक**

नाशिक जिल्ह्यात गेले दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसाचा ग्रामीण भागाला  मोठा फटका बसला आहे. बागलाण तालुक्यात शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाला. इतर दोन जण जखमी झाले आहेत. गोदावरीच्या पात्रातील वाढत्या पाण्यामुळे निफाड तालुक्यातील नदीकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे.

**धुळे**

धुळे जिल्ह्यात मुसळधार पावसाने 4 धरण पूर्ण क्षमतेनं भरली आहेत. पूराच्या पाण्यात दोघांचा मृत्यू झाला असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

येत्या पाच दिवसांत राज्याच्या विविध भागात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, घाटमाथा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर रायगड, पुणे आणि सातारा घाट परिसर तसंच रत्नागिरी जिल्ह्याला आज मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.